# कऱ्हाडे ब्राह्मणांचा इतिहास

कऱ्हाडे हे प्रादेशिक नाव आहे. ते करहाटक प्रांत व त्यातील करहाटक हे शहर यांवरून पडलेले आहे. तसेच दक्षिणी ब्राह्मणांतला तो एक पोटभेद आहे. कऱ्हाडे ब्राह्मण हे कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ, गोवा आदी भागांत सर्वत्र पसरलेले आहेत. कऱ्हाड्यांतील ५४५ उपनामांपैकी २०२ उपनामे गावांच्या नावांपुढे 'कर' असा प्रत्यय लावून बनवलेली आहेत. त्यांची एकूण २४ गोत्रे आहेत. सर्व कऱ्हाडे ब्राह्मण एकवेदी (ऋग्वेदी), एक सूत्री (आश्वलायन सूत्री) व एक शाखी (शाकल शाखी आहेत). बहुतेक कऱ्हाडे स्मार्त असून अद्वैत मतानुयायी आहेत. काही कऱ्हाडे वैष्णवही आहेत, पण ते त्या मानाने फारच थोडे आहेत. बहुतेक कऱ्हाड्यांची देवता कोल्हापूरची महालक्ष्मीच आहे. तथापि, गोमन्तकातील कऱ्हाड्यांच्या कुलदेवता शांतादुर्गा, म्हाळसा, महालक्ष्मी आदी आहेत. अनंत चतुर्दशीची पूजा, ललिता पंचमी, दुर्गाष्टमी व नवरात्रात सप्तशतीचे पाठ कऱ्हाडे ज्ञातीत विशेषत्वाने आढळतात.

**करहाटक प्रांतातून कोकणात आगमन :** आपल्यातील आजवर प्रसिद्ध झालेले निरनिराळ्या घराण्यांचे इतिहास पाहिले तर हे चटकन लक्षात येते की, करहाटक किंवा कऱ्हाड प्रांतातून ही ब्राह्मण घराणी प्रथम कोकणात गेली व तिथूनच नंतर ती अन्यत्र गेली. असे दिसते की, दक्षिण कोकणची भूमी वसाहतीस योग्य झाल्यावर, शिलाहार राजे यांच्या प्रोत्साहनमुळे तिथे वसाहत करण्याकरिता निरनिराळ्या प्रदेशांतून लोक आले व स्थायिक झाले. त्यापैकी आपली कऱ्हाडे ज्ञाती ही एक होय.

उदाहरणार्थ मावळंकर (सरदेसाई, लळित, गोविळकर) घराण्यांचे मूळ पुरुष नृसिंहभट्ट सत्यवादी हे मूळचे पैठणचे. ते इ.स. ११५० चे सुमारास संगमेश्वर तालुक्यातील मावळंगे येथील जागृत नृसिंहाची उपासना करण्यासाठी येथे आले व त्यांनी कठोर तपश्चर्या केली. त्यायोगे त्यांना पुत्रलाभ झाला. त्यांच्या नातवाला शिलाहार राजे विजयार्क यांच्याकडून इ.स. ११८५ च्या सुमारास संगमेश्वर गाव इनाम मिळाले.

इतिहासाचार्य राजवाडे म्हणतात की, नृसिंहभट्ट यांचे कऱ्हाड घराणे हे कोकणातील पहिले व महत्त्वाचे होय. करहाटक ब्राह्मणांचे राजापूर-संगमेश्वर टापूत आगमन यांचे बरोबर झाले.

तसेच, मराठवाड्यातील आंबेजोगाईतील खेर घराणे आले, ते कोकणात नेवरे येथे स्थायिक झाले.

सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील 'आटोली' गावाहून इ. स. च्या अकराव्या शतकाच्या सुमारास आठल्ये आले व ते कोकणात देवळे महालाचे 'धर्माधिकारी' बनले.

गुलबर्ग्याहून इ. स. १४२५ मध्ये पंडित (सरदेशपांडे, जमिनीस, कुलकर्णी) देवळे, लांजे, हरचेरी, हातखंबा व पावस महालाच्या कुलकर्णी वतनाच्या सनदा घेऊन कोंकणात आले. ओरपे (सरपोतदार, कारखानीस, सबनीस आदी) ही घराणी करहाटक प्रांतातून कोकणात आली.

गुजरातेतून गुर्जर आले व ते राजापूरला स्थायिक झाले.

कदंबराजांनी (कमलादेवी व माधव मंत्री यांनी) कित्येक ब्राह्मण घराणी गोमंतकात नेली व तिथे त्यांना इनामे दिली. त्यामुळे ते गोमंतकातच स्थायिक झाले. पुढे मुसलमान व पोर्तुगीज यांच्या आक्रमणामुळे त्यापैकी काही घराणी निर्वासित झाली आणि रत्नागिरी जिल्ह्याच्या दक्षिण भागात स्थायिक झाली. ठाकूरदेसाई, प्रभूदेसाई, अधिकारी देसाई या घराण्यांची कुलदैवते गोमंतकातील आहेत; यावरून वरील विधानाला पुष्टीच मिळते. गोमंतकात अद्यापही कऱ्हाडे ब्राह्मणांची २०० कुटुंबे आहेत. म्हार्दोळ व शांतादुर्गा देवस्थानचे महाजन पाध्ये हे मूळचे पाध्ये होत. सध्या कऱ्हाडे हे सर्व भारतभर व बाहेरही पसरलेले आहेत. इतकेच नव्हे तर, **काशी-रामेश्वर-नाशिक व नेपाळातील पशुपतेश्वर या देवस्थानातील क्षेत्रोपाध्याय** कऱ्हाडेच आहेत. तथापि, ते मुळात करहाटक प्रांतातून कोकणात आले व कऱ्हाडे झाले हे खरे.

कऱ्हाड्यांचे व्यवसाय : इतिहासकाळात बहुतेक कऱ्हाडे खोत, इनामदार, सरदेसाई, देसाई, सरदेशपांड्ये, पोतदार, सरपोतदार, सरमुकादम, सबनीस, कारखानीस इत्यादी हुद्देदार होते. त्यामुळे त्या काळात त्या गावचे किंवा विभागाचे प्रमुख पद यांच्याकडे असे. सांप्रत कऱ्हाडे ब्राह्मण भारताच्या सर्व भागांत आढळतात व निरनिराळे व्यवसाय करतात.

आपल्या ज्ञातीतील काही आदर्श

असामान्य बुद्धिमत्तेच्या व कर्तृत्वाच्या जोरावर कऱ्हाड्यांनी

जीवनातील अनेक क्षेत्रे पादाक्रांत करून आपल्या पेशात विविधता आणली आहे. साहित्य, काव्य, राजकारण, नाटक, संगीत, इतिहास, शास्त्र, गणित, शल्यचिकित्सा, चित्रकला, उद्योग, कारखानदारी वगैरे एकही क्षेत्र असे नाही की, जेथे कऱ्हाडा चमकला नाही.

अद्वितीय रणरागिणी झाशीची राणी लक्ष्मीबाई भारतातील राजकारणपटुत्व असलेली पहिली स्त्री ठरते. मुंबई प्रांतातील पहिले मुख्यमंत्री बाळासाहेब खेर, स्वतंत्र भारताचे पहिले सभापती दादासाहेब मावळंकर, भारताचे पोलादी गृहमंत्री गोविंद वल्लभ पंत आणि अनेकांनी भारतीय राजकारणात बहुमोल कार्य करून आपली नावे चिरस्मरणीय केली आहेत.

साहित्यातील कऱ्हाड्यांचे मानदंड लिहू घातले तर तो एक विस्तीर्ण खंडच होईल. महानुभाव पंथ प्रस्थापित करणारे श्री चक्रधर, नव्या युगाची नांदी करणारे 'दर्पणकार' बाळशास्त्री जांभेकर, 'आर्या मयूरपंताची' यथार्थत्वाने सार्थ करणारे मोरोपंत पराडकर, धर्मसिंधुकारक पाध्ये, कादंबऱ्यांनी रसिक महाराष्ट्रास डोलावणारे श्री. विठ्ठल सीताराम गुर्जर, ज्ञानपीठ पारितोषिक विजेते भाऊसाहेब खांडेकर, शंकरराव किर्लोस्कर, धनुर्धारी टिकेकर, महाकवी यशवंत, राजकवी भास्करराव तांबे, महाराष्ट्र टाइम्सचे गोविंद तळवलकर, साहित्य संमेलनाध्यक्षा दुर्गा भागवत, नाट्य संमेलनाचे अध्यक्ष भालचंद्र पेंढारकर, माडखोलकर, प्रभाकर पाध्ये, श्री. रा. टिकेकर, काटदरे आदी अनेक नावे वानगीदाखल देता येतील.

पं. भास्करबुवा बखले, गोविंदराव टेंबे, पेंढारकर, जगन्नाथबुवा पुरोहित, पं. जितेंद्र अभिषेकी यांनी आपल्या कर्तृत्वाने संगीतक्षेत्र झळाळून टाकले. इतिहास संशोधनात रियासतकार सरदेसाई, शेजवलकर, प. कृ. गोडे यांनी केलेले कार्य अनन्यसाधारण आहे. आजही आधुनिक महाराष्ट्राचे भीष्माचार्य दादासाहेब पोतदार ते कार्य या वयातही नेटाने चालवीत आहेत. मराठी नाटकाच्या इतिहासात तर किर्लोस्कर, वसंत कानेटकर, शं. ना. नवरे यांच्या नाटकांनी उभ्या महाराष्ट्राला वेड लावले आहे. अभिनयात पेंढारकर पती-पत्नी, प्रभाकर पणशीकर, दाजी भाटवडेकर, शदर तळवलकर हे लाजबाब आहेत.

आयुर्वेद म्हटला की धूतपापेश्वरचे पुराणिक, सांडू, गुण्ये हीच नावे डोळ्यांसमोर येतात. स्वस्तिक रबरचे वैद्य, सप्रे, किर्लोस्कर प्रभृतींनी औद्योगिक महाराष्ट्र जगाच्या नकाशात नेऊन बसविला आहे. चित्रकलेत देऊसकर, सातवळेकर पिता-पुत्र, गुर्जर हे बिनीचे मानकरी ठरले आहेत. न्याय खात्यात न्या. ढवळे, न्या. तांबे, न्या. सप्रे ही नावे सर्वांच्या परिचयाची आहेत. नुसते तळवलकर हे आडनाव व्यायाम, डॉक्टरी, उद्योग वा अभिनय सुचविते. सुप्रसिद्ध गणिती जयवंतराव नारळीकर यांनी अत्यंत तरुण वयात शास्त्रज्ञ म्हणून जगन्मान्यता मिळवली आहे. अशी अक्षरशः शेकडो उदाहरणे सांगता येतील.

संग्राहक- **अविनाश मणेरीकर,** सावंतवाडी .

**कऱ्हाडे ब्राह्मण महासंघास हार्दिक शुभेच्छा!**

प्रथमच लहान मुलांसाठी
आयुर्वेदिक उपचार

**।।शिशुर्वेद।।**



॥ayurveda॥

**डॉ. चंद्रशेखर एन्. तांबे**
B.S.A.M.
**जगन्नाथ दिनकर क्लिनिक**
नवीन शनिमारुती मंदिरासमोर
**रामाचा गोट, सातारा - ४१५ ००२.**
मो. ९८२२४ २४८६५

## संस्कृत सुभाषिते

**रात्रिर्गमिष्यति भविष्यति सुप्रभातम्**
**भास्वानुदेष्यति हसिष्यति पमजश्रीः।**
**इत्थं विचिन्तयति कोशगते द्विरेफे**
**हा हन्त हन्त नलिनीं गज उज्जहार।।**

(दैवाचा कल्पनेत नसलेला हस्तक्षेप.) रात्र संपेल, सकाळ होईल, सूर्य उगवेल, कमळ फुलेल- कमळाच्या कोशात अडकलेला भुंगा असा विचार करीत असतांनाच अरेरे, हत्तीने कमळाची वेलच उपटली!